# इस्त्राएल–पॅलेस्टाईन

## पुरन्दरे चन्द्रशेखर

आज जगात इस्त्राएल–पॅलेस्टाईन [हमास] युद्ध ही प्रमुख घटना आहे. लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत – नोव्हेंबर तिसरा आठवडा, तेरा हजाराहून जास्त पॅलेस्टीनी लोकांची इस्त्राएलने हत्या केली आहे, त्यात साडेपाच हजाराहून अधिक मुले, साडेतीन हजाराहून अधिक स्त्रिया. काही लाखात लोक विस्थापित झाले आहेत व होत आहेत. हे आकडे रोज वाढतच आहेत.

इस्त्राएल शेजारचे पॅलेस्टीनी दोन विभक्त प्रदेशात रहातात. गाझा आणि वेस्ट बँक. [नकाशा – डावीकडे भूमध्य समुद्र, खाली इजिप्त]. (पान ३६ वरील नकाशात पहा)

### अर्वाचीन इतिहास

पॅलेस्टीनी लोक अरब वंशाचे मुस्लिम आहेत. ते इथले मूळचे भूमिपुत्र. दुसऱ्या महायुद्धानंतर विजेत्या देशांनी १९४८ मध्ये इस्त्राएलची येथे स्थापना केली. जगभरचे वेगवेगळ्या देशात विखुरलेले व दुय्यम नागरिक असणारे ज्यू तेथे आले. आधीची पॅलेस्टीनी खेडी हुसकावून ज्यू वस्ती आणली. तेव्हापासून अरब–ज्यू हा संघर्ष चालू आहे. पॅलेस्टाईनची समर्थक अरब राष्ट्रे व इस्त्राएल यांच्यात अनेक युद्धे झाली.

भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी Palestine Liberation Organisation [PLO] ची स्थापना १९६४ ला झाली. तेव्हा इस्त्राएलचे अस्तित्वच त्यांना अमान्य होते, १९९३ ला त्यांनी ते मान्य केले. पण पॅलेस्टाईनमधील इस्त्राएलविरोधी जहाल प्रवाहाला ही तडजोड पसंत नव्हती. १९८७लाच या विचाराच्या हमास नावाच्या गटाची स्थापना झाली होती. इस्त्राएल विरुद्ध सशस्त्र लढा हे त्यांचे ध्येय राहिले आहे. हमासचा प्रभाव गाझामध्ये राहिला तर वेस्ट बँकेत PLOच्या फता गटाचा. २००७ पासून गाझामध्ये हमासचे निर्वाचित सरकार आहे. अमेरिका व युरोपियन युनियनने हमास ही आतंकवादी संघटना असल्याचे जाहीर केले आहे.

पॅलेस्टाईनच्या प्रदेशावर इस्त्राएल नागरी अतिक्रमण सतत चालू ठेवतो. नवीन वस्त्या पॅलेस्टीनी प्रदेशात येत आहेत. तेथे नव्याने रहायला आलेले कडवे ज्यू विशेष अरब द्वेष्टे असतात. ते शेजारच्या पॅलेस्टीनी वस्त्यांवर हिंसक हल्ले करतात.

### गाझा

गाझा प्रदेश ४१ कि. मी. लांब आणि ६ ते १२ कि. मी. रुंदीची एक चिंचोळी पट्टी आहे. त्यात २२ लाखाहून अधिक लोक दाटीवाटीने रहातात. गाझा आणि वेस्ट बँक इस्त्राएलच्या नियंत्रणाखाली आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार लोकांच्या मूलभूत गरजा भागवणे ही इस्त्राएलची जबाबदारी आहे. बाहेरून येणारा अन्नपुरवठा, वीज, पाणी, इंटरनेट या जीवनावश्यक सेवा चालू ठेवणे इस्त्राएलचे कर्तव्य आहे. या कर्तव्याचे उल्लंघन हा गुन्हा आहे. इस्त्राएल हे कर्तव्य मानत नाही कारण हे लोक असलेच तर दुय्यम नागरिक आहेत.

गाझामध्ये आजवरही लोकांना नागरी अधिकार नाहीत. त्यांनी कोठे रहायचे, मुलांना कोणत्या शाळेत घालायचे, कोणत्या डॉक्टरकडे जायचे, कोणत्या प्रकारची ओळखपत्रे जवळ बाळगायची इत्यादि गोष्टी इस्त्राएल ठरवते. रात्री–बेरात्री घरांवर लष्करी धाडी घातल्या जातात, मुलांना लष्कर व पोलिस ताब्यात घेतात, त्यांचे हाल करण्यात येतात, प्रसंगी ठारही मारण्यात येते. अंतर्गत प्रवासावर निर्बंध असतात. त्यांना गाझा सोडून जाता येत नाही. ठिकठिकाणी इस्त्राएली चेक–पोस्टस असतात. गाझाच्या एकूण लोकसंख्येच्या दोन–तृतीयांश लोक कागदोपत्री निर्वासित आहेत. त्यामुळे गाझा जगातील सर्वात मोठा 'खुला' तुरुंग मानला जातो. [जालियनवाला बाग]

या परिस्थितीमुळे गाझा आणि वेस्ट बँकेमध्ये इस्त्राएलविरुद्ध मोठ्या प्रमाणावर असंतोष खदखदत राहिलेला आहे. १९८७ ते '९३ आणि २००० ते २००५ मध्ये पॅलेस्टाईनमध्ये इस्त्राएलविरुद्ध मोठे सार्वजनिक निषेध उसळले. त्याला इंतिफादा म्हणतात. मुळात या लोकांना इस्त्राएल नको. तसेच इतर अरब देशांना आणि इराणला. त्यामुळे पॅलेस्टाईनबरोबरच या देशांकडून इस्त्राएलला सतत धोका वाटत आलेला आहे. मग रेटून तेथेच रहाण्यासाठी इस्त्राएलने आपले लष्करी सामर्थ्य प्रचंड वाढवले. त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. हमासचे निषेध म्हणजे इस्त्राएलवर रॉकेट्स सोडायचे, आत्मघातकी हल्ले करायचे. त्यात थोडीफार जीवितहानी करायची.

अशा हल्ल्यानंतर इस्राएल प्रतिहल्ले करतो. या चकमकी सतत चालू असतात. रॉकेट्स येत आहेत हे कळावे म्हणून इस्राएलने अमेरिकन मदतीने २०११ मध्ये इलेक्ट्रॉनिक 'घुमट' [Iron Dome] बनवला ज्यायोगे रॉकेट जमिनीवर येण्याआधी कळत असे. मग ते निष्प्रभ केले जाई.

## युद्ध

या पार्श्वभूमीवर या ७ ऑक्टोबरला हमासने इस्राएलवर मोठा हल्ला केला. इस्राएल अभेद्य असल्याचा इस्राएलचा आजवरचा दंभ फोल ठरला. प्रथम सुमारे पाच हजार रॉकेट्स एकाच वेळी सोडण्यात आली. एवढ्या मोठ्या प्रमाणातील रॉकेट्स 'घुमट' रोखू शकला नाही. जोडीला काही हजार हमासचे सैनिक इस्राएलमध्ये घुसले. त्यांनी सीमेवरच्या छोट्या वस्त्यांमध्ये घरोघर जाऊन बाराशे सामान्य नागरिक ठार मारले. त्यात वृद्ध, मुले, गर्भवती स्त्रियाही होत्या. काहींचे निर्घृण हाल करण्यात आले. काहींचे हात–पाय बांधून त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. संगीताचा एक सार्वजनिक कार्यक्रम जवळ चालू होता. त्यात गर्दीने तरुण सामील होते. तेथे बेछूट गोळीबार करून किमान शंभर लोकांना ठार मारले, बाकीचे अनेक पळवले. भविष्यातील सौदेबाजीसाठी इतरही दीडशे लोक व इस्राएली सैनिक पळवण्यात आले, ते ओलिस आहेत.

इस्राएलने लगेच अधिकृतरीत्या युद्ध जाहीर केले. प्रथम गाझाचा वीज, पाणी, इंधन, इंटरनेट पुरवठा बंद करण्यात आला. त्याबरोबरच प्रचंड प्रमाणावर हवाई हल्ले व बॉम्बफेक चालू आहे. नंतर रणगाडे गाझामध्ये घुसवले. गाझाची दोन वैशिष्ट्ये – एक म्हणजे हमासचे कट्टर इस्लामी सामान्य नागरिकात मिसळून रहातात. त्यामुळे त्यांना अलग वेचता येत नाही. हल्ल्यात त्यांच्याबरोबर निरपराधीही बळी पडतात, दुसरे म्हणजे, त्यांनी या प्रदेशात इमारतींखाली मोठे बोगदे केले आहेत. ते त्यांचे 'ऑफिस/गोदाम'. तेथे कॉम्पुटर्सबरोबर बंदुका, बॉम्बस् अशी शस्त्रेही ठेवली जातात. हॉस्पिटल्स, शाळा हे हमासचे असे अड्डे असल्याचा इस्राएलचा दावा आहे. ते नष्ट करण्यासाठी त्यांच्यावरही बॉम्ब टाकण्यात आले, बुलडोजर फिरवण्यात आले. वस्तुत: युद्धात या संस्थांवर हल्ला करू नये असा आंतरराष्ट्रीय कायदा आहे. इस्राएलने तो झुगारला. वेस्ट बँकेतही इस्राएलने हल्ले सुरू केले आहेत.

युद्ध सुरू झाल्याच्या आठवड्याभरात उत्तर गाझातील रहिवाशांना दक्षिण गाझाला स्थलांतरित व्हायला सांगण्यात आले. त्यासाठी २४ तासांची अशक्य मुदत दिली. कारण असे की, उत्तर गाझावर जमिनीवरून इस्राएल हल्ला करणार. म्हणजे एकूण ११ लाख लोक विस्थापित होणार. आधी इंटरनेट, फोन बंद, अन्नाचा तुटवडा, सार्वजनिक वाहने नाहीत, इंधन संपल्यामुळे खाजगी वाहने बंद. लोक अंगावरच्या कपड्यांनिशी गाढवांच्या गाड्यांवरून मुला–बाळांना, वृद्ध, अपंग यांना घेऊन प्रवास करत असल्याचे चित्रण टीव्ही दाखवतो. हमासची अट युद्धविराम केल्यास व इस्राएलच्या ताब्यातील पॅलेस्टीनी कैदी सोडल्यास, ओलिसांना सोडवू अशी आहे. तर इस्राएलची भूमिका हमासचा संपूर्ण नाश आणि ओलिसांची सुटका तर युद्ध थांबवू अशी आहे. म्हणजे दोन्ही बाजू संवाद करू इच्छित नाहीत. इस्राएलमध्ये ओलिसांच्या सुटकेसाठी सरकारवर दडपण वाढत आहे,

## आंतरराष्ट्रीय प्रतिसाद

या युद्धाचे प्रतिसाद उमटत आहेत. त्यात अमेरिकेने व इंग्लंडने इस्राएलला पाठिंबा दिला आहे. अमेरिकेने तर आरमारी जहाजे इस्राएलच्या समर्थनासाठी या प्रदेशाला रवाना केली. संयुक्त राष्ट्रसंघ आणि अरब राष्ट्रे तातडीने युद्धविरामाची मागणी करत आहेत. पण हमासच्या बाबत अरब देशांची भूमिका सावध आहे कारण, त्यांच्या देशात प्रस्थापिताविरुद्ध असंतोष आहेच, हमासला विरोध केल्यास तो विरोध वाढेल, तसेच युद्ध इस्राएल–गाझाबाहेर पसरणे त्यांना नको आहे. इस्राएलविरोधी वक्तव्ये करणे जास्त सोयीचे. शिवाय त्यातील काही देश इस्राएलकडून शस्त्रसामग्रीही घेतात.

जॉर्डन या शेजारच्या देशात मोठ्या प्रमाणावर पॅलेस्टीनी निर्वासित आधीपासून आहेत. त्यांची आता वाढलेली अस्वस्थता हिंसक होऊ शकते.

विशेष म्हणजे, इराण या कट्टर इस्राएलविरोधी देशाच्या पाठिंब्यावर हेझबोल्ला नावाची आतंकी संघटना लेबेनॉन या नजीकच्या देशात आहे. त्यांनाही इस्राएलचे अस्तित्व मान्य नाही. ते इस्राएलवर रॉकेट्स सोडत असतात. सध्याचे युद्ध सुरू झाले तेव्हा अंदाज असा होता की हमासला समर्थन म्हणून हेझबोल्लाही इस्राएलविरुद्ध युद्धात उतरेल. तसे आजवर झालेले नाही. इराणच्या पाठिंब्यावर येमेन देशातही इस्राएलविरोधी हिंसक संघटना आहे. तिने इस्राएलच्या आरमारावर रॉकेट्स सोडणे

**(पान ३६ वर)**

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2021-23
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2021-23
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

**(जगभर : पान २३ वरुन)**

यानंतर २१ ऑक्टोबरला भारताला येत असलेले एक मालवाहू जहाज हायजॅक केले आहे. उल्लेखनीय म्हणजे फक्त तुर्कस्तानची भूमिका संतुलित आणि शांतीसाठी प्रामाणिक प्रयत्न करणारी दिसते. अशी भूमिका भारताने घ्यायला हवी होती. आपण इस्राएलला नि:संदिग्ध पाठिंबा देणे खेदजनक आहे.

एका अंदाजानुसार गाझाची उत्तर–दक्षिण अशी फाळणी करण्याचा इस्राएलचा प्रयत्न आहे. मग दोन्ही भाग नियंत्रित ठेवणे त्याला सोपे जाईल. दुसऱ्या अंदाजानुसार संपूर्ण उत्तर गाझाचे नागरिक इजिप्तमध्ये हलवण्याची इस्राएलची योजना असावी. मग हे लोक दुसऱ्यांदा किंवा तिसऱ्यांदा निर्वासित होतील.

**निरीक्षण**

एकूण चित्र पहाता मध्य–पूर्व येता बराच काळ अस्थिर राहणार असे दिसते. या प्रकारचा हिंसाचार चालू रहाणे दोन्ही बाजूंना श्रेयस्कर नाही याची जाणीव दोन्हीकडे अत्यल्पसंख्य लोकांना आहे. ते जगभर एरवीही सरकारी धोरण ठरवायला अक्षम असतात, तेच येथेही.

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk




'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
**प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.**

To